दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद
आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा
संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड
PUNE : Volume No. 2, Issue No. 28, Marathi Daily Tuesday, Date - 01 September 2026 Price 2 Rupees, Pages - 4
पुणे अवृत्ती | वर्ष २ रे | अंक २८ वा | मराठी दैनिक | मंगळवार दि. ०१ सप्टेंबर २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

# मराठवाडा-विदर्भावर दुष्काळाचे सावट

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीला जून महिन्यात अपेक्षित पाऊस झाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली होती. त्यानंतर जुलै महिन्यात झालेल्या दमदार पावसामुळे जूनमधील तूट काही प्रमाणात भरून निघाली. अनेक भागांत जोरदार पाऊस झाल्याने पिकांना दिलासा मिळाला, तर धरणांच्या पाणीपातळीतही लक्षणीय वाढ झाली. मात्र, ऑगस्ट महिन्यात पुन्हा पावसाचा जोर कमी झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. आता सप्टेंबर महिन्यातही अपेक्षेप्रमाणे पाऊस होण्याची शक्यता कमी असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आल्याने शेतकऱ्यांसमोरील संकट अधिक गंभीर होण्याची चिन्हे दिसत आहेत.

१ जून ते ३१ ऑगस्ट या कालावधीचा विचार करता राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाल्याची नोंद आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची परिस्थिती चिंताजनक आहे. काही भागांत पावसाच्या मोठ्या सरींची अद्यापही प्रतीक्षा कायम असून, पिकांना सध्या पाण्याची नितांत गरज आहे. पावसाने आणखी दडी मारल्यास खरीप पिकांच्या उत्पादनावर त्याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जुलै महिन्यात राज्यातील अनेक भागांत झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणांच्या पाणीसाठ्यात चांगली वाढ झाली. धरण क्षेत्रात झालेल्या पावसामुळे पाणीटंचाईची चिंता काही प्रमाणात दूर झाली होती. त्यामुळे शेतकरी आणि प्रशासनाला मोठा दिलासा मिळाला. मात्र, त्यानंतर ऑगस्टमध्ये पावसाचे प्रमाण कमी झाल्याने अनेक भागांमध्ये पुन्हा पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मराठवाड्यातील परिस्थिती विशेष चिंताजनक असल्याचे चित्र आहे. बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि हिंगोली यांसह काही जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. काही ठिकाणी पावसाच्या तुरळक सरी झाल्या असल्या तरी पिकांना आवश्यक असलेला सलग आणि समाधानकारक पाऊस अद्याप झालेला नाही. त्यामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मका आणि इतर खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.



यंदाच्या पावसाळ्यात सुरुवातीपासूनच हवामानातील बदलांकडे लक्ष लागले आहे. प्रशांत महासागरातील समुद्राच्या तापमानातील बदल आणि त्याचा भारतीय पावसाळ्यावर होणारा संभाव्य परिणाम याबाबत हवामान अभ्यासकांकडून विविध अंदाज व्यक्त करण्यात आले आहेत. एल निनोचा प्रभाव राहण्याची शक्यता सुरुवातीपासून चर्चेत होती. आता पावसाचा खंड वाढत असल्याने त्या अंदाजाची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

राज्यातील अनेक भागांत पावसाची कमतरता असली तरी धरणांमधील पाणीसाठ्याची स्थिती सध्या तुलनेने समाधानकारक आहे. जुलैमध्ये झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी धरणांमध्ये जमा झाले. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. मात्र, पुढील काळात पाऊस कमी राहिल्यास उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे.

सप्टेंबर हा पावसाळ्याच्या दृष्टीने महत्त्वाचा महिना मानला जातो. खरीप पिकांच्या वाढीसाठी या काळात मिळणारा पाऊस अत्यंत महत्त्वाचा असतो. विशेषतः पिकांच्या अंतिम वाढीच्या टप्प्यात पावसाची गरज असते. त्यामुळे सप्टेंबरमध्येही पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होण्याची शक्यता आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजामुळे शेतकऱ्यांचे लक्ष आता सप्टेंबर महिन्यातील पावसाकडे लागले आहे. राज्यातील ज्या भागांमध्ये आतापर्यंत समाधानकारक पाऊस झालेला नाही, त्या भागात पुढील काही आठवडे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. पावसाने साथ दिली नाही तर काही जिल्ह्यांमध्ये पिकांचे नुकसान वाढण्याची शक्यता आहे.

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## थोडक्यात...

### माजी सरपंच अन् घरफोडीचा आरोप; सीसीटीव्हीमुळे पोलिसांच्या जाळ्यात



**सांगली । प्रतिनिधी**

मिरज तालुक्यातील अंकली येथील माजी सरपंच राहुल अनिल पाटील याच्यावर विश्रामबाग परिसरातील एका बँक अधिकाऱ्याच्या बंद घरात घरफोडी केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने करत सीसीटीव्हीच्या आधारे राहुल पाटील याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचा पोलिसांचा दावा असून, त्याच्याकडून चोरीचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे. अटकेनंतर वैद्यकीय कारणास्तव त्याला जामीन मिळाल्याचे सांगण्यात आले.

राहुल पाटील हा भाजपशी संबंधित असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे गावातील लोकप्रतिनिधी राहिलेल्या व्यक्तीवरच घरफोडीचा आरोप झाल्याने अंकलीसह पंचक्रोशीत खळबळ उडाली आहे.

विश्रामबाग येथील एसटी कॉलनीमध्ये अश्विन शिवकुमार पिल्ले यांचे घर आहे. पिल्ले हे राष्ट्रीयकृत बँकेत सहायक व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. १९ ऑगस्ट रोजी पिल्ले यांचे घर बंद असताना घरफोडी करून चोरट्यांनी सुमारे सहा लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. याप्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकानेही या प्रकरणाचा तपास हाती घेतला. तपासादरम्यान पोलिसांच्या हाती काही सीसीटीव्ही चित्रण लागले. त्याच्या आधारे घरफोडी करणारी व्यक्ती राहुल पाटील असल्याचे निष्पन्न झाल्याचा पोलिसांचा दावा आहे. त्यानंतर पथकाने राहुल पाटील याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलिसांनी चौकशी केल्यानंतर त्याने घरफोडी केल्याची कबुली दिल्याचे सांगण्यात आले. त्याच्याकडून चोरी केलेला मुद्देमालही पोलिसांनी हस्तगत केला. या प्रकरणी राहुल पाटील याला अटक करण्यात आली होती. मात्र, वैद्यकीय कारणास्तव त्याला न्यायालयाने जामीन मंजूर केल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण पथक आणि विश्रामबाग पोलिसांकडून सुरू आहे.

# प्रेमसंबंधाचा दुर्दैवी शेवट; २३ वर्षीय तरुणीने घेतला टोकाचा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

प्रियकरासोबत झालेल्या वादानंतर २३ वर्षीय संगणक अभियंता तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना खराडी परिसरात घडली. या प्रकरणी तरुणीच्या प्रियकराविरुद्ध खराडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. दोघांमध्ये नेमका कोणत्या कारणावरून वाद झाला आणि त्यामागे काय कारण होते, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

जान्हवी पाठक (वय २३) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. ती मूळची बिहार येथील असून, गेल्या दोन महिन्यांपासून पुण्यात राहत होती. शुक्रवारी दुपारी दीडच्या सुमारास खराडी परिसरातील रिव्हर डेल सोसायटीमध्ये ही घटना घडली. याप्रकरणी उत्तर प्रदेश येथे राहणाऱ्या तिच्या ४९ वर्षीय काकांनी खराडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमृतकुमार अरुणकुमार सिंह (वय २३, मूळ रा. पहाडगंज, दिल्ली) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. जान्हवी आणि अमृतकुमार हे पूर्वीपासून एकमेकांच्या परिचयाचे होते. त्यांचे शालेय शिक्षणही एकत्र झाले होते. पुढे दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले.



जान्हवीने राजस्थानमधून अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले होते. त्यानंतर ती खराडी परिसरातील एका माहिती-तंत्रज्ञान कंपनीत अभियंता म्हणून काम करत होती. अमृतकुमार हा नोएडा येथील एका माहिती-तंत्रज्ञान कंपनीत कार्यरत आहे. जान्हवी पुण्यात राहत असल्याने तिला भेटण्यासाठी अमृतकुमार दोन दिवसांपूर्वी नोएडा येथून पुण्यात आला होता. गुरुवारी रात्री दोघांमध्ये कोणत्या तरी कारणावरून वाद झाला. हा वाद इतका वाढला की दोघांमध्ये मारामारीही झाली. त्यानंतर शुक्रवारी सकाळी अमृतकुमार खोलीच्या खाली उतरला. त्याचवेळी जान्हवीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे समोर आले. या घटनेनंतर पोलिसांनी अमृतकुमारला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे. दोघांमध्ये नेमका कोणत्या कारणावरून वाद झाला, त्यांच्या नात्यात कोणता तणाव निर्माण झाला होता आणि आत्महत्येमागे नेमकी काय परिस्थिती होती, याचा पोलिस तपास करत आहेत.

**जाहीर प्रगटन**

दैनिक महिला संवाद

मध्ये छोटया जाहिराती आणि पॅनल जाहिराती

फक्त 300 रुपयात

प्रसिद्ध करण्यात येतील :
- जाहीर प्रगटन
- पाहिजेत / पाहिजे
- जन्मतारीख बदल
- नावात बदल
- मालमत्ता हस्तांतरण
- खरेदी-विक्री
- स्वरूपाच्या यासंबंधी छोटया जाहिराती

दैनिक महिला संवाद
आपला विश्वास, आमची जबाबदारी

जाहिराती केवळ 300 रुपरात प्रसिद्ध केल्या जातील.

इच्छुकांनी आजच या नंबरवर संपर्क साधावा.

9168567111

# महापालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला आढावा

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्ते, पदपथ, स्वच्छता, विद्युत सुरक्षा आणि विसर्जन व्यवस्थेला प्राधान्य देण्याचे दिले निर्देश

**पिंपरी । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या अनुषंगाने विद्युत तारा व जोडण्यांची सुरक्षितता तपासून धोकादायक जोडण्यांवर संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने कार्यवाही करावी. कृत्रिम विसर्जन हौदांची तयारी, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि सुरक्षा व्यवस्था वेळेत पूर्ण करावी. तसेच प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्याने आपला प्रभाग स्वच्छ, सुंदर आणि नागरिकांसाठी सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी. पदपथ पादचाऱ्यांसाठी मोकळे करावेत, सार्वजनिक स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता, झाडांची छाटणी आणि रस्त्यांची दुरुस्ती वेळेत पूर्ण करावी. बीट निरीक्षकांमार्फत अनधिकृत बांधकामांवर बारकाईने लक्ष ठेवून तातडीने निष्कासनाची कार्यवाही करावी, अशा सूचना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामध्ये आगामी गणेशोत्सव तसेच शहरातील विविध नागरी सुविधांच्या अनुषंगाने आयुक्त डॉ.सूर्यवंशी यांनी संबंधित विभागप्रमुख व अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. यावेळी शहरातील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, स्वच्छता व्यवस्था, रस्ते व पदपथांची स्थिती, विद्युत सुरक्षाव्यवस्था, उद्याने, गणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम विसर्जन हौदांची तयारी तसेच नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा आदी विषयांचा आढावा घेण्यात आला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देताना आयुक्त बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मनोज सेठिया, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, प्रेरणा सिनकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपआयुक्त सचिन पवार, सीताराम बहुरे, राजेश आगळे, डॉ. प्रदीप ठेंगल, अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, संदीप खोत, पंकज पाटील, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, सहाय्यक आयुक्त अमित पंडित, तानाजी नरळे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, अश्विनी गायकवाड, निवेदिता घार्गे, अजिंक्य येळे, पूजा दूधनाळे, परशुराम वाघमोडे, गोरक्षनाथ लिम्हण, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह स्थापत्य, विद्युत, पर्यावरण आदी विभागांचे कार्यकारी अभियंता आणि कर्मचारी उपस्थित होते.



**बैठकीत दिलेल्या सूचना. कृत्रिम विसर्जन हौदांची तयारी वेळेत पूर्ण करा**

गणेशमूर्ती विसर्जनासाठी शहरातील कृत्रिम विसर्जन हौदांची आवश्यक तयारी वेळेत पूर्ण करावी. विसर्जनस्थळी स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, सुरक्षा आणि नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. गणेशोत्सव काळात विविध विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून नागरिकांना सुरक्षित व सुरळीत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

याशिवाय, गणेशोत्सवाच्या अनुषंगाने शहरातील विद्युत तारा व जोडण्यांची सुरक्षितता तपासावी. धोकादायक किंवा अनधिकृत विद्युत जोडण्यांबाबत संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून तातडीने कार्यवाही करावी. तसेच उत्सवाच्या काळात शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी ठेवावी आणि रस्ते खड्डेमुक्त करण्याची कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करावी.

**प्रभाग स्वच्छ व अतिक्रमणमुक्त ठेवण्याची क्षेत्रीय अधिकाऱ्यांची जबाबदारी**

आपला प्रभाग स्वच्छ, सुंदर आणि अतिक्रमणमुक्त ठेवणे ही प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्याची जबाबदारी आहे. क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील फुटपाथवरील अतिक्रमणे तातडीने हटवून पादचाऱ्यांसाठी पदपथ मोकळे करून द्यावेत. प्रभागातील सार्वजनिक स्वच्छतागृहे नियमितपणे स्वच्छ ठेवावीत, वेळोवेळी झाडांची छाटणी करावी तसेच रस्ते सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

**अनधिकृत बांधकामांवर बीट निरीक्षकांमार्फत बारकाईने लक्ष ठेवा**

प्रभागातील अनधिकृत बांधकामांवर बीट निरीक्षकांमार्फत बारकाईने लक्ष ठेवावे. नव्याने होणाऱ्या अनधिकृत बांधकामांची माहिती तातडीने संबंधित विभागाच्या निदर्शनास आणून त्यावर निष्कासनाची कार्यवाही करावी. अनधिकृत बांधकामांना कोणत्याही परिस्थितीत प्रोत्साहन मिळणार नाही, याची दक्षता घेऊन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी.

**अनधिकृत बांधकामांच्या नळ, वीज जोडणी खंडित करण्याबाबत कार्यवाही करा**

शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधात प्रभावी कारवाई करण्याबरोबरच अशा बांधकामांना देण्यात आलेल्या नळजोडण्या तसेच विद्युत पुरवठा खंडीत करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करावी.अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यासोबतच संबंधित प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाई करावी.

**सदनिका खरेदीपूर्वी बांधकामाची पडताळणी करण्याबाबत नागरिकांना जागृत करा**

नागरिकांनी सदनिका किंवा इमारतीमधील मालमत्ता खरेदी करताना संबंधित बांधकाम अधिकृत आहे किंवा नाही, याची पडताळणी करण्याबाबत नागरिकांना अवगत करा. मंजूर बांधकाम आराखडा, आवश्यक परवानग्या आणि महापालिकेच्या संबंधित नोंदी तपासूनच सदनिका खरेदी करावी याबाबत नागरिकांना जागृत करा, अशा.

**नागरिकांच्या तक्रारींचा तातडीने निपटारा करा**

महापालिकेच्या सारथी प्रणालीवर तसेच शासनाच्या संकेतस्थळांवर नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची संबंधित विभागप्रमुखांनी तातडीने दखल घेऊन त्यांचा वेळेत निपटारा करावा. नागरिकांच्या तक्रारी प्रलंबित राहणार नाहीत, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी नियमितपणे तक्रारींचा आढावा घ्यावा आणि केलेल्या कार्यवाहीची नोंद ठेवावी.

**लोकप्रतिनिधींच्या पत्रांना, तक्रारींना वेळेत प्रतिसाद द्या**

लोकप्रतिनिधींकडून महापालिकेकडे प्राप्त होणारी पत्रे, निवेदने आणि तक्रारी यांची संबंधित विभागांनी गांभीर्याने दखल घेऊन त्यावर वेळेत कार्यवाही करावी. प्राप्त पत्रांना व तक्रारींना अनावश्यक विलंब होणार नाही, याची दक्षता घेत संबंधित लोकप्रतिनिधींना करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत वेळेत कळवावे.

**वाचनालये, ग्रंथालये व व्यायामशाळांची संख्या वाढविण्यावर भर द्यावा**

शहरातील नागरिकांना अधिक चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वाचनालये, ग्रंथालये आणि व्यायामशाळांची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे. यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय उपलब्ध जागांचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार जागा निश्चित कराव्यात. नागरिकांच्या गरजा आणि स्थानिक मागणीचा विचार करून या सुविधा विकसित करण्याबाबत नियोजन करावे, अशा सूचनाही आयुक्त डॉ.सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# संपादकीय...

## शेतकऱ्यांची वाढती चिंता

यंदाचा पावसाळा शेतकऱ्यांसाठी सुरुवातीपासूनच अनिश्चिततेचा ठरला आहे. जून महिन्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली. त्यानंतर जुलै महिन्यात अनेक भागांत झालेल्या दमदार पावसाने काही प्रमाणात दिलासा दिला. जून महिन्यातील पावसाची तूट जुलैच्या पावसाने भरून काढली आणि अनेक ठिकाणी पिकांना नवसंजीवनी मिळाली. धरण क्षेत्रातही चांगला पाऊस झाल्याने जलसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याची चिंता काही काळासाठी दूर झाली होती. मात्र, ऑगस्ट महिन्यात पावसाने पुन्हा दडी मारल्याने परिस्थितीने वेगळे वळण घेतले. पावसाचा खंड वाढत गेला आणि अनेक भागांतील शेतकऱ्यांची नजर पुन्हा आभाळाकडे लागली. खरीप पिके वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असताना पावसाचा अभाव जाणवू लागल्याने उत्पादनाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता सप्टेंबर महिन्यातही अपेक्षित पाऊस होण्याची शक्यता कमी असल्याचा अंदाज समोर आल्याने शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे. १ जून ते ३१ ऑगस्ट या कालावधीतील पावसाचा विचार केला तर राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाल्याचे चित्र आहे. ही बाब केवळ हवामानाच्या आकडेवारीपुरती मर्यादित नाही. या पावसाच्या तुटीचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो. पाऊस कमी झाला की त्याचा परिणाम पिकांच्या वाढीवर होतो, उत्पादन घटते आणि शेतीवरील खर्च वसूल होण्याची शक्यताही कमी होते. त्यामुळे पावसातील प्रत्येक खंड शेतकऱ्यांसाठी आर्थिक जोखमीचा ठरतो. मराठवाडा आणि विदर्भातील परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि हिंगोलीसह अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. काही ठिकाणी पावसाच्या तुरळक सरी झाल्या असल्या तरी त्या पिकांसाठी पुरेशा ठरलेल्या नाहीत. सोयाबीन, कापूस, तूर, मका यांसारखी खरीप पिके पावसाच्या लहरीपणामुळे अडचणीत येऊ शकतात. विशेषतः पिकांच्या वाढीच्या आणि उत्पादन निश्चित होण्याच्या काळात पावसाची कमतरता राहिली तर त्याचा थेट परिणाम उत्पन्नावर होण्याची शक्यता आहे. पावसाचे असे चक्र दरवर्षी शेतकऱ्यांसमोर नवे प्रश्न उभे करते. पावसाळा सुरू होण्यापूर्वी पाऊस कधी येईल, किती येईल आणि किती दिवस टिकेल याचा निश्चित अंदाज बांधणे कठीण असते. पाऊस उशिरा आला तर पेरणीचा प्रश्न निर्माण होतो; पाऊस एकदम मोठ्या प्रमाणात झाला तर पिके वाहून जाण्याचा धोका असतो आणि पेरणीनंतर दीर्घ खंड पडला तर पिके वाळण्याची भीती निर्माण होते. म्हणजेच शेतकऱ्यांसाठी पाऊस असो किंवा पावसाचा खंड असो, दोन्ही परिस्थितींमध्ये जोखीम कायम आहे यंदाच्या परिस्थितीत जुलै महिन्यातील पावसाने राज्याला मोठा दिलासा दिला हे निश्चित. अनेक धरणांमध्ये पाणीसाठा वाढला. काही जलसाठे भरल्याने आगामी काळातील पाणीपुरवठ्याबाबत आश्वासक स्थिती निर्माण झाली. मात्र, धरणांमध्ये पाणी असणे आणि शेताच्या बांधावर वेळेवर पाऊस पडणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. धरणांतील पाणीसाठा समाधानकारक असला तरी पिकांना आवश्यक त्या वेळी पाऊस न मिळाल्यास शेतकऱ्यांच्या अडचणी कमी होत नाहीत. त्यामुळे जलसाठ्याची स्थिती चांगली असल्याच्या दिलाशासोबतच पिकांसाठी आवश्यक पावसाची उपलब्धता हा मुद्दा तितकाच महत्त्वाचा आहे. सप्टेंबर महिना खरीप पिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. पिकांच्या अंतिम वाढीच्या टप्प्यात योग्य प्रमाणात पाऊस मिळाला तर उत्पादनाला आधार मिळू शकतो.

# भटके-विमुक्तांच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक सक्षमीकरणावर भर द्यावा - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**पुणे । प्रतिनिधी**

भटके-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य देण्याची गरज आहे. या समाजातील कोणत्याही बालकाचे शिक्षण त्यांच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे बाधित होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

फर्ग्युसन महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने आयोजित 'भटके-विमुक्त दिवस' या राज्यस्तरीय कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, भटके-विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धवराव काळे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज, संचालक सोनाली मुळे आदी उपस्थित होते.

'भटके-विमुक्त दिवस' अन्यायातून मुक्ती, आत्मसन्मान, अधिकार, शिक्षण, सक्षमीकरण आणि सामाजिक प्रतिष्ठेचा दिवस असल्याचे नमूद करीत राज्यपाल वर्मा म्हणाले, शिक्षण ही या समाजाच्या विकासाची सर्वात मोठी शक्ती असून, त्यासोबत कौशल्य विकास आणि पुनर्कौशल्य विकासावरही भर देणे आवश्यक आहे. पालकांच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये, यासाठी कुटुंबे वास्तव्यास असलेल्या ठिकाणी मुलांच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. वसतिगृहे, आश्रमशाळा, शिष्यवृत्ती, डिजिटल शिक्षण, उच्च व व्यावसायिक शिक्षण तसेच संशोधनाच्या संधी वाढविण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी सांगितले.

भटके-विमुक्त समाजातील मुलींच्या शिक्षणाला विशेष प्राधान्य देण्याची गरज असून, एक शिक्षित मुलगी संपूर्ण कुटुंबाचे आणि पुढील पिढ्यांचे भविष्य बदलू शकते, असेही त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या संधींशी जोडण्यासाठी 'स्कूल कनेक्ट'सारख्या उपक्रमांचा उपयोग होत असल्याचे त्यांनी सांगितले. भटके-विमुक्त आणि घुमंतू समाजाचे शेती, शिल्पकला, पशुपालन, वाहतूक, लोककला क्षेत्रातील योगदानाचा विशेष उल्लेख करून राज्यपाल वर्मा म्हणाले, भटके-विमुक्त समाजाचा संघर्ष हा केवळ इतिहासाचा नाही तर सामाजिक न्यायाचा विषय आहे. स्थिर निवास, जमिनीचा अधिकार, नागरिकत्वाची कागदपत्रे, शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा आणि शासकीय योजनांचा लाभ मिळविताना समाजाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणी दूर करण्यासाठी शासन आणि समाजाने एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, जात प्रमाणपत्र, मतदार ओळखपत्र आणि रेशनकार्ड यांसारखी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी विशेष शिबिरांच्या आयोजनाची सूचना त्यांनी केली.



पारंपरिक कौशल्यांना आधुनिक बाजारपेठेशी जोडून भटके-विमुक्त समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करावे. हस्तकला, लोककला, पशुपालन, छोटे व्यवसाय आणि पारंपरिक उपजीविकेच्या साधनांना आधुनिक तंत्रज्ञान व बाजारपेठेची जोड देऊन रोजगाराच्या नव्या संधी निर्माण कराव्यात. युवकांना कौशल्य विकास, डिजिटल तंत्रज्ञान, स्टार्टअप आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा, असे आवाहन राज्यपालांनी केले.

### भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध - मंत्री अतुल सावे

भटके-विमुक्त समाजातील नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, शासकीय प्रमाणपत्रे, रोजगार, स्वयंरोजगार आणि पायाभूत सुविधांवर शासनाच्या माध्यमातून विशेष भर देण्यात येत आहे. समाजातील प्रत्येक घटकाला शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक ओळखपत्रे व प्रमाणपत्रे सुलभतेने मिळावीत सुलभ कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. महसूल विभाग आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या माध्यमातून आतापर्यंत ९ लाख २७ हजार ९७३ शासकीय प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले असून, यापुढे वस्तीस्तरावर शिबिरे घेऊन ही प्रक्रिया अधिक गतिमान करण्यात येणार असल्याचे मंत्री सावे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी प्री-मॅट्रिक, पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती तसेच शिक्षण व परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत दिली जात आहे. महाडीबीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट निधी जमा करण्यात येत असून, या योजनांसाठी आतापर्यंत सुमारे ४ हजार २३६ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी २०२१-२२ पासून इंग्रजी माध्यमाच्या निवासी शिक्षणाची सुविधा सुरू असून, आतापर्यंत सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांना त्याचा लाभ झाला आहे. तसेच ओबीसी व एसबीसी विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणाची संधी मिळावी यासाठी दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे.

ओबीसी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवता यावे यासाठी महाज्योतीच्या माध्यमातून यूपीएससी, एमपीएससी, पोलीस भरती आदी परीक्षांसाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत जाण्याची संधी मिळत असल्याचे मंत्री सावे यांनी नमूद केले.

भटके-विमुक्त समाजाच्या वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वस्ती सुधार योजना राबविण्यात येत आहे. पारंपरिक कला, संस्कृती आणि उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी 'बंजारा हट' उभारण्यात आले आहे. तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या माध्यमातून स्वयंरोजगार व व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, भटके-विमुक्त समाजातील महिलांना शिक्षणाचा अभाव, बालविवाह आणि सामाजिक विषमतेला सामोरे जावे लागते. वैदू समाजातील महिलांना वस्तू विक्रीसाठी जाताना चोरीच्या संशयातून अपमानास्पद वागणूक मिळते. त्यामुळे महिला व बालकांच्या संरक्षणासह त्यांच्या सक्षमीकरणासाठी विशेष प्रयत्न व निधीची गरज आहे. समाजाने आपली भाषा, संस्कृती आणि ओळख जपत शिक्षणाच्या माध्यमातून विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी शासनाकडून विविध सकारात्मक उपक्रम राबविले जात असून, त्याला अधिक गती देण्यासाठी स्वतंत्र धोरण, शिक्षण आणि घरकुलाच्या सुविधा आवश्यक आहेत. शासन आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयातून समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू राहावेत, असे भटके-विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धवराव काळे यांनी सांगितले.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज यांनी प्रास्ताविकात भटके-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, मूलभूत कागदपत्रे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यास शासनाचे प्राधान्य असल्याचे सांगितले.

राज्यपालांच्या हस्ते भटके-विमुक्त समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच समाज बांधवांना प्रतिनिधिक स्वरूपात जातीच्या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध पुस्तिकांचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला भटके-विमुक्त समाजाचे प्रतिनिधी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अधिकारी उपस्थित होते.

# माओवादी चळवळीचे स्वरूप : जंगलातील बंदुकीपासून शहरातील नेटवर्कपर्यंत

भारतामधील माओवादाचा प्रश्न समजून घेताना केवळ जंगलात शस्त्रे घेऊन फिरणाऱ्या सशस्त्र कॅडरकडे पाहून चालणार नाही. माओवादी चळवळीची रचना अनेक स्तरांची आहे. तिच्या एका टोकाला सशस्त्र संघर्ष करणारी यंत्रणा आहे, तर दुसऱ्या टोकाला विचारसरणीचा प्रचार, संघटनात्मक संपर्क, निधी, भरती आणि विविध प्रकारचे सहाय्य करणारे घटक आहेत. त्यामुळे माओवादाचा खरा मुकाबला करायचा असेल तर बंदूक चालवणाऱ्या हाताबरोबर त्या बंदुकीमागची संपूर्ण व्यवस्था समजून घेणे आवश्यक आहे. भारत सरकारने कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी)ला बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित केले आहे. तिच्याशी संबंधित षीरीं ळेपी आणि षीपीं ीसरपळीरीं ळेपी चाही गृह मंत्रालयाच्या अधिकृत माहितीत उल्लेख आहे. या संघटनेची सशस्त्र शाखा म्हणून पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचा उल्लेख केला जातो. त्यामुळे माओवादी चळवळीचा पहिला स्पष्ट स्तर म्हणजे सशस्त्र माओवादी. हे लोक प्रत्यक्ष हिंसक कारवाया, सशस्त्र संघर्ष, सुरक्षा दलांवरील हल्ले, स्फोट आणि संघटनेच्या लष्करी उद्दिष्टांशी संबंधित काम करतात. त्यांचे अस्तित्व प्रामुख्याने जंगल आणि दुर्गम भागांशी जोडलेले राहिले आहे. मात्र गेल्या काही वर्षांतील सरकारी आकडेवारी पाहिली तर या सशस्त्र यंत्रणेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार २०१० मध्ये डाव्या अतिरेकी हिंसाचाराच्या १,९३६ घटना घडल्या होत्या. २०२५ मध्ये त्या २३४ वर आल्या. नागरिक आणि सुरक्षा दलांच्या मृत्यूची संख्या २०१० मधील १,००५ वरून २०२५ मध्ये १०० झाली. २०१८ मध्ये १२६ जिल्हे डाव्या अतिरेकी प्रभावाखाली होते; डिसेंबर २०२५ पर्यंत ही संख्या आठवर आली. २०२५ मध्ये ३६४ माओवादी निष्प्रभ करण्यात आले, १,०२२ जणांना अटक झाली आणि २,३३७ जणांनी आत्मसमर्पण केले. ही आकडेवारी महत्त्वाची आहे. कारण यावरून एक गोष्ट स्पष्ट होते-माओवादी चळवळीची पारंपरिक सशस्त्र ताकद मोठ्या प्रमाणात कमकुवत झाली आहे.

मग प्रश्न असा निर्माण होतो की, सशस्त्र ताकद कमी झाल्यानंतर माओवादी संघटना आपले अस्तित्व कसे टिकवते?

माओवादी विचारसरणीचा प्रचार करणारे, संघटनेच्या राजकीय उद्दिष्टांना समर्थन देणारे आणि नव्या कार्यकर्त्यांवर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे घटक या व्यापक स्तरात येतात. मात्र येथे एक अत्यंत महत्त्वाची रेषा आखणे गरजेचे आहे. डावा विचार मांडणारा प्रत्येक नागरिक, सरकारवर टीका करणारा प्रत्येक कार्यकर्ता, आदिवासी हक्कांसाठी लढणारा प्रत्येक सामाजिक कार्यकर्ता किंवा मानवी हक्कांचा प्रश्न उपस्थित करणारी प्रत्येक व्यक्ती माओवादी ठरत नाही. माओवादी संघटनेशी प्रत्यक्ष संबंध आणि केवळ समान सामाजिक किंवा राजकीय भूमिका यामध्ये मोठा फरक आहे.

तिसरा स्तर म्हणजे ओव्हरग्राउंड नेटवर्क आणि फ्रंट संघटनांचा प्रश्न. गृह मंत्रालयाने माओवादी संघटनेच्या शहरी आणि निमशहरी भागातील फ्रंट संघटनांचा उल्लेख केला आहे. अशा नेटवर्कच्या संदर्भात प्रचार, भरती, निधी उभारणी, भूमिगत कार्यकर्त्यांना शहरी आश्रय, संपर्क आणि इतर सहाय्याच्या भूमिकांचा उल्लेख सरकारी कागदपत्रांत करण्यात आला आहे. यामुळे माओवादी चळवळीचा मुकाबला करताना केवळ जंगलातील कारवाई पुरेशी ठरत नाही. पैसा कुठून येतो? भूमिगत कार्यकर्त्यांना मदत कोण करतो? संपर्क कोण साधतो? भरती कशी होते? संघटनेचा प्रचार कोण करतो? या प्रश्नांची उत्तरेही तपासावी लागतात. मात्र याच ठिकाणी सर्वांत मोठी काळजी घ्यावी लागते. शहरी माओवादी हा शब्द कोणावरही मनमानीपणे लावता येणार नाही. एखाद्या व्यक्तीने आदिवासींच्या जमिनीचा प्रश्न उपस्थित केला म्हणून ती माओवादी होत नाही. एखाद्या व्यक्तीने पोलिस अत्याचारावर प्रश्न विचारला म्हणून ती माओवादी होत नाही. एखादा वकील माओवादी आरोपीचा न्यायालयात बचाव करतो म्हणून तो माओवादी ठरत नाही. अशा निष्कर्षांसाठी प्रत्यक्ष संघटनात्मक संबंध, आर्थिक व्यवहार, संदेशवहन, कागदपत्रे, साक्षी किंवा अन्य पुरावे आवश्यक असतात.म्हणूनच माओवादी समस्येचा सामना करताना दोन चुका टाळाव्या लागतील. पहिली चूक म्हणजे आदिवासींच्या वास्तविक प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे. जमीन बळकावणे, वनहक्क, विस्थापन, खाणकाम, रोजगार, प्रशासनाचा अभाव किंवा पोलिसी अन्याय यांसारखे प्रश्न असतील तर त्यांचे निराकरण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. हे प्रश्न दुर्लक्षित राहिले तर निर्माण होणारा असंतोष माओवादी संघटनांना वापरता येतो. दुसरी चूक म्हणजे प्रत्येक असंतोषामागे माओवादी षड्यंत्र शोधणे. त्यामुळे सामान्य नागरिक आणि सरकार यांच्यातील विश्वास कमी होऊ शकतो आणि माओवादी संघटनांना उलट फायदा होऊ शकतो. म्हणून योग्य धोरण स्पष्ट आहे-आदिवासींच्या न्याय्य मागण्यांना न्याय आणि हिंसक माओवादी नेटवर्कवर कायद्याची कठोर अंमलबजावणी.

माओवादी चळवळीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ सामाजिक प्रश्नांची चळवळ नाही. तिच्या राजकीय विचारसरणीमध्ये सशस्त्र क्रांतीद्वारे विद्यमान राज्यव्यवस्था बदलण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे जमीन, जंगल, विस्थापन किंवा आदिवासी हक्क हे प्रश्न जनतेमध्ये पोहोचण्याचे माध्यम असू शकतात; पण संघटनेचे अंतिम राजकीय लक्ष्य त्यापेक्षा व्यापक आहे. आज परिस्थिती बदलली आहे. माओवादी संघटनेची देशाची सत्ता उलथवून टाकण्याइतकी सशस्त्र क्षमता असल्याचे उपलब्ध सरकारी आकडेवारीवरून दिसत नाही. उलट, गेल्या दशकात तिचा भौगोलिक आणि लष्करी प्रभाव मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. तरीही संघटना पूर्णपणे संपली आहे असे म्हणणे घाईचे ठरेल. कारण लष्करी ताकद कमी होणे आणि विचारसरणी, संपर्क किंवा संघटनात्मक नेटवर्क पूर्णपणे संपणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. म्हणून पुढचा टप्पा अधिक सूक्ष्म आहे. जंगलातील सशस्त्र कॅडरवर कारवाई झाली पाहिजेच; पण त्याचबरोबर निधीचे स्रोत, शस्त्रांचा पुरवठा, भूमिगत संपर्क, ओव्हरग्राउंड नेटवर्क आणि माओवादी संघटनेशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या शहरी घटकांचा पुराव्यांच्या आधारे तपास झाला पाहिजे. त्याच वेळी सरकारने आदिवासी भागात न्याय, जमीनहक्क, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि प्रशासन पोहोचवले पाहिजे. कारण जिथे शासनाचा न्याय पोहोचत नाही, तिथे हिंसक विचारसरणीला जागा मिळण्याचा धोका वाढतो.



माओवादी समस्येवर अंतिम उत्तर केवळ बंदुकीत नाही आणि केवळ चर्चेतही नाही. सुरक्षा, कायदा, न्याय, विकास आणि विश्वास-या पाचही गोष्टी एकत्र आल्या तरच माओवादी चळवळीचा सामाजिक आधार कायमचा कमकुवत करता येईल. आज जंगलातील नक्षलवाद मोठ्या प्रमाणात मागे हटला आहे. त्यामुळे आता प्रश्न अधिक स्पष्ट आहे-

बंदूक कुठे आहे हे सरकारने शोधलेच आहे; आता त्या बंदुकीला पैसा, संपर्क, विचार आणि मनुष्यबळ कुठून मिळत होते, याची संपूर्ण साखळीही शोधली पाहिजे.

**डॉ. सुवर्णा कराड,**
प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ,
महिला आघाडी महाराष्ट्र.



# साडी नेसून अनवाणी धावल्या; मुलींच्या शिक्षणासाठी आईने जिंकली 'अमृत दौड'

## चिखलमय रस्त्यावर अनवाणी धावल्या अन् प्रथम क्रमांक पटकावला; समाबाईंची जिद्द प्रेरणादायी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मुलींच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संघर्ष करणाऱ्या ४७ वर्षीय समाबाई रणवीर यांनी समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. अंबाजोगाई येथे आयोजित 'अमृत दौड' स्पर्धेत त्यांनी साडी परिधान करून अनवाणी धावत प्रथम क्रमांक पटकावला. पावसामुळे रस्ता चिखलमय झाला असतानाही त्यांनी जिद्दीने शर्यत पूर्ण केली.

विशेष म्हणजे, कोणतेही महागडे खेळाचे बूट किंवा विशेष प्रशिक्षण नसताना समाबाई यांनी ही कामगिरी केली. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत त्यांनी तीन हजार रुपयांचे बक्षीसही पटकावले. समाबाई या मुलींच्या शिक्षणासाठी आर्थिक अडचणींवर मात करत स्वयंपाकाचे काम करतात. परिस्थितीशी दोन हात करत मुलींना शिक्षण देण्याचा त्यांचा निर्धार आहे. त्यांच्या या



कामगिरीचे महिलांसह तरुणांकडूनही कौतुक होत आहे. मुलींच्या शिक्षणासाठी कितीही संघर्ष करावा लागला तरी मी मागे हटणार नाही, असा संदेश समाबाई यांनी आपल्या कृतीतून दिला.

प्रतिनिधी पाहिजेत
पत्रकार होण्याची सुवर्ण संधी ?
जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे दैनिक महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी प्रतिनिधी पाहिजेत. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर संपर्क सांधावा.
दैनिक महिला संवाद कार्यालय
- मुख्यकार्यालय पत्ता - गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना 9168567111
- विभागीय कार्यालय पत्ता - सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदिरजवळ, पुणे शहर, पुणे-४११०१७ (महाराष्ट्र)
mahilasanvad11@gmail.com https://epaper.mahilasanvad.com

## शस्त्राचा धाक दाखवून आदिवासी महिलेवर अत्याचार; महिनाभरानंतर दोन आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**बुलढाणा । प्रतिनिधी**

मलकापूर तालुक्यातील दुधलगाव परिसरात शेतात मजूर म्हणून काम करणाऱ्या १९ वर्षीय आदिवासी महिलेवर शस्त्राचा धाक दाखवून अत्याचार केल्याच्या प्रकरणाचा अखेर ४० दिवसांनी छडा लागला आहे. बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मध्य प्रदेशातील बुऱ्हानपूर तालुक्यातून दोन आरोपींना अटक केली आहे.



१८ जुलै रोजी मध्यरात्रीच्या सुमारास ही संतापजनक घटना घडली होती. पीडित महिला शेतात मजूर म्हणून काम करत होती. त्यावेळी दोन आरोपींनी शस्त्राचा धाक दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर आरोपी पसार झाले होते.

या गंभीर प्रकरणाचा तपास बुलढाणा पोलिसांनी हाती घेतला. आरोपींनी घटनास्थळी कोणताही ठोस पुरावा मागे न सोडल्याने पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान होते. मात्र, पोलिसांनी सखोल आणि तांत्रिक तपास सुरू ठेवला. तब्बल ४० दिवस विविध दिशांनी तपास करत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपींचा माग काढला. अखेर दोन्ही आरोपी मध्य प्रदेशातील बुऱ्हानपूर तालुक्यात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पथकाने तेथे कारवाई करत दोघांनाही ताब्यात घेतले.

या कारवाईमुळे महिनाभरापासून प्रलंबित असलेल्या अत्याचार प्रकरणाची उकल करण्यात पोलिसांना यश आले. आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखा आणि संबंधित पोलिसांकडून सुरू असून, आरोपींनी गुन्हा नेमका कशा पद्धतीने केला आणि या प्रकरणात आणखी काही बाबी आहेत का, याचा तपास केला जात आहे.

## 'जो ठाकरेंचा होऊ शकला नाही, तो जरांगेंचा कसा होणार?'; संजय राऊतांचा बंडू जाधवांवर हल्लाबोल

**मुंबई । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील हे आपल्या समाजाचे नेतृत्व करत असून, प्राण पणाला लावून मराठा आरक्षणासाठी लढत आहेत. सततच्या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावत आहे. त्यामुळे त्यांनी वारंवार उपोषण करू नये, अशी विनंती आपण त्यांना केली होती, असे शिवसेना नेते संजय राऊत यांनी सांगितले. दरम्यान, परभणीचे खासदार संजय बंडू जाधव यांनी जरांगे पाटील यांच्या आवाहनानंतरही शेतकरी मेळावा घेतल्याच्या मुद्द्यावरून राऊत यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली.

परभणीचे खासदार संजय बंडू जाधव यांनी नुकताच शेतकरी मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रित करण्यात आले होते. मात्र, मनोज जरांगे पाटील यांनी हा मेळावा रद्द करण्याची भूमिका घेतली होती. तरीही मेळावा घेण्यात आला. यावर बोलताना राऊत म्हणाले की, मराठवाड्यात वातावरण तापलेले असताना आणि जरांगे पाटील उपोषणाला बसलेले असताना हा मेळावा घेण्यात आला.

खासदार संजय बंडू जाधव यांना निवडून आणण्यासाठी त्यावेळी मनोज जरांगे पाटील यांची मोठी मदत झाली होती, हे सत्य आहे. जरांगे यांनी अशी अपेक्षा केली असेल, तर जाधव यांनी त्याग करायला हवा होता, असे राऊत म्हणाले.



'बंडू जाधव इतकी वर्षे ठाकरेंकडे सत्ता भोगूनही ठाकरेंचे होऊ शकले नाहीत. त्यांनी सर्व पदे भोगली. ते आता मनोजदादा जरांगे यांचे कसे होतील? ते नवनवीन आई-बाप शोधत असतात,' अशी बोचरी टीका राऊत यांनी केली. जाधव आणि जरांगे यांच्यात सध्या काय सुरू आहे, ते पाहावे लागेल. हा त्यांचा अंतर्गत लढा असल्याचेही त्यांनी सांगितले.

खासदार जाधव यांची सर्वात मोठी चूक म्हणजे त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी गद्दारी केली, असा आरोपही राऊत यांनी केला. 'जो माणूस ठाकरेंचा होऊ शकत नाही, त्यांच्याकडून जरांगे पाटलांनी काय अपेक्षा करावी?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

मनोज जरांगे पाटील यांनी संबंधितांना धडा शिकवण्याची भूमिका घेतली आहे. मला त्यांचा स्वभाव माहीत आहे. ते धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत, असा दावा राऊत यांनी केला. गद्दारी करून गेलेले लोक पुन्हा संसदेत जाऊ नयेत, याची व्यवस्था शिवसैनिकांनी केली असल्याचेही ते म्हणाले.

दरम्यान, जरांगे पाटील यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या समाजाची फसवणूक होत आहे. त्यामुळे त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून या प्रश्नावर मार्ग काढला पाहिजे. मुख्यमंत्री मात्र कुंपणावर बसून आहेत. नागपूरमध्ये बसून चर्चा करून मार्ग काढू, अशी विधाने केली जातात. आतापर्यंत कोणत्या विषयावर मुख्यमंत्र्यांनी मार्ग काढला आहे, ते त्यांनी सांगावे, अशी टीकाही संजय राऊत यांनी केली.

## ६८० नव्हे, मिळाले फक्त १६० गुण; विद्यार्थिनीची याचिका फेटाळली, २५ हजारांचा दंड

**नागपूर । प्रतिनिधी**

वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता परीक्षेत ६८० गुण मिळाल्याचा दावा करणाऱ्या एका विद्यार्थिनीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दणका दिला आहे. प्रत्यक्ष उत्तरपत्रिकेची पडताळणी केल्यानंतर विद्यार्थिनीला ७२० पैकी केवळ १६० गुण मिळाल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे तिची याचिका फेटाळत न्यायालयाने तिला २५ हजार रुपये खर्च म्हणून जमा करण्याचे आदेश दिले.



विद्यार्थिनीने राष्ट्रीय परीक्षा संस्थेने आपले कर्तव्य योग्यरीत्या पार पाडले नसल्याचा आरोप करत न्यायालयात याचिका दाखल केली होती. परीक्षेत आपल्याला ६८० गुण मिळणे अपेक्षित होते, असा दावा तिने केला होता. मात्र, तिच्या निकालाबाबत वारंवार आक्षेप घेण्यात आल्यानंतर न्यायालयाने मूळ उत्तरपत्रिकेची पडताळणी करण्याचे निर्देश दिले.

न्यायालयासमोर मूळ उत्तरपत्रिकेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. त्यावेळी विद्यार्थिनीने दिलेल्या उत्तरांच्या आधारे तिला ७२० पैकी केवळ १६० गुण मिळाल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, उत्तरपत्रिकेची पाहणी झाल्यानंतर विद्यार्थिनीनेही तिला १६० गुणच मिळाल्याचे मान्य केले. त्यामुळे ६८० गुण मिळाल्याचा तिचा दावा चुकीचा असल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणात राष्ट्रीय परीक्षा संस्थेने कर्तव्य बजावले नसल्याचा आरोप केल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. विद्यार्थिनीच्या वारंवारच्या दाव्यामुळे मूळ उत्तरपत्रिकेची पडताळणी करण्यासाठी संबंधित यंत्रणेला अतिरिक्त प्रशासकीय प्रक्रिया करावी लागली. विद्यार्थिनीचे वर्तन दोषपूर्ण असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

याचिका फेटाळताना न्यायालयाने सुरुवातीला विद्यार्थिनीवर ५० हजार रुपये खर्च लावण्याचा विचार केला होता. मात्र, विद्यार्थिनीचे हित लक्षात घेऊन ही रक्कम कमी करण्यात आली. अखेर तिला २५ हजार रुपये जमा करण्याचे आदेश देण्यात आले. हा निर्णय न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्या खंडपीठाने दिला.

## जुन्या आर्थिक वादातून भररस्त्यात तरुणाची हत्या; लोखंडी हातोडीने डोक्यावर वार

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

जुन्या आर्थिक वादातून ३२ वर्षीय तरुणाची भररस्त्यात लोखंडी हातोडी आणि लाकडी दांड्याने डोक्यावर व मानेवर सपासप वार करून हत्या करण्यात आली. रविवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास जिन्सी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सेंट्रल नाक्याजवळील मदनी चौकात ही धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी काही तासांतच दोन आरोपींना अटक केली.



फरेस बिन अब्दुल अजिज अलकसेरी असे मृत तरुणाचे नाव आहे. फरेस हा पडेगाव परिसरात कुटुंबासह राहत होता. कामानिमित्त तो मित्रासोबत मदनी चौकात आला होता. त्यावेळी त्याचे आतेभाऊ अहमद खलील बादाम आणि अदनान खलील बादाम यांच्यासोबत जुन्या आर्थिक व्यवहारावरून वाद झाला.

वाद वाढत गेल्यानंतर अहमद बादाम याने लोखंडी हातोडीने फरेसच्या डोक्यावर आणि मानेवर जोरदार वार करण्यास सुरुवात केली. त्याचवेळी लाकडी दांड्यानेही त्याच्यावर हल्ला करण्यात आला. वार चुकवण्याच्या प्रयत्नात फरेसच्या हातालाही गंभीर दुखापत झाली. या हल्ल्यात तो गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळला.

घटनेनंतर फरेसला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच जिन्सी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

दरम्यान, हल्ल्यानंतर दोन्ही आरोपी पसार होण्याच्या तयारीत होते. पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवत अहमद बादाम आणि अदनान बादाम या दोघांना काही तासांतच ताब्यात घेतले. या प्रकरणी जिन्सी पोलिस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## थोडक्यात

### महापौरांचा पती असल्याचे भासवून फोटोग्राफी शिक्षकाची बदनामी; चॅनलविरोधात गुन्हा

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईच्या महापौर ऋतू तावडे यांचे पती असल्याचा खोटा दावा करत लालबाग येथील एका फोटोग्राफी शिक्षकाची बदनामी करणारा व्हिडीओ यूट्यूबवर प्रसारित केल्याचा प्रकार समोर आला आहे. शिक्षकाचा फोटो महापौरांच्या फोटोसोबत जोडून त्यांची चुकीची ओळख आणि व्यवसायाबाबत खोटी माहिती प्रसारित करण्यात आली. या प्रकरणी कालाचौकी पोलिसांनी यूट्यूब चॅनल चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे लालबाग परिसरातील रहिवासी असून फोटोग्राफी शिक्षक आहेत. कणकवली येथे त्यांचा फोटोग्राफी स्टुडिओ असून ते 'ओसीएल' नावाचे यूट्यूब चॅनलही चालवतात. या माध्यमातून ते आपल्या फोटोग्राफी वर्गांचा प्रचार करतात. तसेच 'राजेश तावडे' नावाच्या फेसबुक खात्यावरून ते स्वतःचे फोटो आणि वर्गांच्या जाहिराती प्रसिद्ध करत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. २६ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास त्यांच्या इमारतीतील एका महिलेने त्यांना व्हॉट्सपवर यूट्यूब व्हिडीओची लिंक पाठवली. संबंधित लिंक उघडल्यानंतर 'जीके-शॉर्ट्स-व्हिडीओज' या यूट्यूब चॅनलवर त्यांच्या नावाने एक व्हिडीओ प्रसारित झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या व्हिडीओमध्ये तक्रारदारांचा फोटो वापरून त्यांना महापौर ऋतू तावडे यांचे पती म्हणून दाखवण्यात आले होते. त्याचबरोबर त्यांना बांधकाम व्यावसायिक आणि बिल्डर असल्याचे सांगण्यात आले. ते वाणिज्य शाखेचे पदवीधर असून क्रिकेट आणि प्रवासाची आवड असल्याची माहितीही व्हिडीओमध्ये देण्यात आली होती.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, व्हिडीओसाठी त्यांचा फोटो फेसबुक खात्यावरून आणि महापौरांचा फोटो सोशल मीडियावरून घेण्यात आला. दोन्ही फोटो एकत्र करून संबंधित व्यक्तीच महापौरांचे पती असल्याचा आभास निर्माण करण्यात आला. त्यामुळे आपली सामाजिक प्रतिष्ठा आणि प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

संबंधित व्हिडीओ २३ ऑगस्ट रोजी अपलोड करण्यात आला होता. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात संबंधित यूट्यूब चॅनल १५ एप्रिल २०२६ रोजी तयार करण्यात आल्याचे आढळून आले. या चॅनलवर विविध राजकीय नेते आणि चित्रपटसृष्टीतील व्यक्तींच्या जीवनाविषयी व्हिडीओ प्रसारित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तक्रारदाराने संबंधित व्हिडीओचे स्क्रीनशॉट आणि इतर माहिती पोलिसांकडे सादर केली आहे.

आपली आणि महापौरांची कोणतीही तथ्यात्मक पडताळणी न करता खोटी माहिती तयार करून ती प्रसारित करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी कालाचौकी पोलिसांनी बदनामीसह संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून व्हिडीओ कोणी तयार केला, तो यूट्यूबवर कोणी अपलोड केला आणि त्यामागे नेमका उद्देश काय होता, याचा तपास सुरू आहे. सोशल मीडियावर कोणत्याही व्यक्तीच्या फोटोचा गैरवापर करून खोटी माहिती प्रसारित करण्याचे प्रकार वाढत असल्याने या घटनेने पुन्हा एकदा सोशल मीडिया वापरातील जबाबदारीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

### वाघोलीत शाळेच्या बसचा अपघात; १५ विद्यार्थी सुखरूप

**पुणे । प्रतिनिधी**

वाघोलीतील रायसोनी महाविद्यालय रस्त्यावर शाळेच्या बसचा भीषण अपघात झाला. भारत पब्लिक स्कूलच्या बसने विद्युत खांबाला जोरदार धडक दिली. या बसमध्ये १५ विद्यार्थी असल्याची माहिती आहे. सुदैवाने या अपघातात बसमधील सर्व विद्यार्थी सुखरूप बचावले.

मात्र, याचवेळी रायसोनी महाविद्यालयात जाणाऱ्या एका विद्यार्थिनीला बसने धडक दिल्याने ती गंभीर जखमी झाली. तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, बस चालक नशेत वाहन चालवत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी संबंधित यंत्रणेकडून तपास सुरू आहे.

# कार चालवताना मोबाईलवर बोलणे जीवावर बेतले; ८ वर्षीय मुलाचा मृत्यू, महिला चालकाला अटक

**मुंबई । प्रतिनिधी**

वांद्रे परिसरात भरधाव कारची धडक बसून आठ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. रविवारी दुपारी जिजामाता गार्डनसमोरील जॉन बाप्टिस्ट रोडवर ही घटना घडली. अंश गुप्ता असे मृत मुलाचे नाव आहे. या प्रकरणी वांद्रे पोलिसांनी कारचालक मेघा रावल हिच्याविरोधात गुन्हा दाखल करून तिला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी साडेदोनच्या सुमारास अंश गुप्ता हा जिजामाता गार्डनसमोरील रस्ता ओलांडत होता. त्याचवेळी मेघा रावल ही कार घेऊन त्या रस्त्याने जात होती. कार चालवताना ती मोबाईलवर बोलत असल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यामुळे रस्ता ओलांडणारा अंश तिच्या लक्षात आला नाही आणि कारची त्याला जोरदार धडक बसली.

या अपघातात अंश गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने हॉली फॅमिली रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्याला मृत घोषित केले.

या प्रकरणी वांद्रे पोलिसांनी मेघा रावल हिच्याविरोधात भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांसह मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. मानवी जीवितास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने अतिवेगाने आणि निष्काळजीपणे वाहन चालवल्याचा ठपका तिच्यावर ठेवण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

**घाटकोपरमध्येही दोन चिमुकल्यांचा अपघाती मृत्यू**

दरम्यान, यापूर्वी घाटकोपर-अंधेरी लिंक रोडवर झालेल्या भीषण अपघातात दोन अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाला होता. आर्यन आलोकनाथ पासवान



(वय १५) आणि गणेश सुनील महामुनी (वय १४), अशी मृत मुलांची नावे आहेत. दोघेही घाटकोपरमधील सिद्धार्थ नगर परिसरात कुटुंबासह राहत होते.

पहाटे गणेशने घरातून वडिलांची दुचाकी घेतली आणि आर्यनला सोबत घेऊन तो निघाला. दोघे घाटकोपर-अंधेरी लिंक रोडवरून जात असताना जागृती नगर मेट्रो स्थानकाजवळ मागून आलेल्या भरधाव कंटेनरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडकेनंतर दोन्ही मुले कंटेनरच्या मागील चाकाखाली चिरडली गेली. त्यांना तातडीने राजावाडी रुग्णालयात नेण्यात आले.

मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या सलग घटनांमुळे मुंबईतील रस्ते सुरक्षेचा आणि वाहनचालकांच्या निष्काळजीपणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# पाच विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध

## ३० सप्टेंबरपर्यंत हरकती व दावे दाखल करण्याची संधी; १ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम यादीची तयारी

**जालना । प्रतिनिधी**

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदारयादी सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारूप मतदारयादीबाबत नागरिकांना दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर प्राप्त दावे-हरकतींची छाननी करून १ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत भारत निवडणूक आयोगाच्या नवी दिल्ली येथील पत्रानुसार ही प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांतील मतदारांची नोंदणी भारत निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदणी नियम, १९६० नुसार करण्यात आली असून, एक प्रत सर्व मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी तसेच मतदान केंद्र कार्यालयांमध्ये पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**पाच मतदारसंघांत १६ लाख ८२ हजार ७२३ मतदार**

जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघांच्या प्रारूप मतदारयादीतील आकडेवारीनुसार एकूण १६ लाख ८२ हजार ७२३ मतदार फॉर्म आहेत. यामध्ये एकूण १४ लाख ३९ हजार ५३६ मतदारांची नोंदणी डिजिटल पद्धतीने पूर्ण झाली असून, २ लाख ४३ हजार १८७ मतदारांची नोंदणी अद्याप पूर्ण झालेली नाही, अशी माहिती देण्यात आली आहे.

**मतदारसंघनिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे :**

विधानसभा मतदारसंघ ९९-परतूर मध्ये एकूण डिजिटल केलेले फॉर्म २,९०,०३१ तर न गोळा झालेले फॉर्म ४०,३४६ आणि एकूण मतदार ३,३०,३७७ आहेत. तर १००-घनसावंगी मध्ये एकूण डिजिटल केलेले फॉर्म २,९९,७२८ तर न गोळा झालेले फॉर्म २८,८७८ आणि एकूण मतदार ३,२८,६०६

१०१-जालना मध्ये एकूण डिजिटल केलेले फॉर्म २,५९,२७९ तर न गोळा झालेले फॉर्म ९९,३५८ आणि एकूण मतदार ३,५८,६३७

१०२-बदनापूर मध्ये एकूण डिजिटल केलेले फॉर्म ३,०२,६३८ तर न गोळा झालेले फॉर्म ३६,२९८ आणि एकूण मतदार ३,३८,९३६

१०३-भोकरदन मध्ये एकूण डिजिटल केलेले फॉर्म २,८७,८६० तर न गोळा झालेले फॉर्म ३८,३०७ आणि एकूण मतदार ३,२६,१६७

असे एकूण डिजिटल केलेले फॉर्म १४,३९,५३६ तर न गोळा झालेले फॉर्म २,४३,१८७ आणि एकूण मतदार १६,८२,७२३ आहेत.

यामध्ये जालना विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ५८ हजार ६३७ मतदार, तर भोकरदन मतदारसंघात सर्वाधिक कमी ३ लाख २६ हजार १६७ मतदार असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. परतूर मतदारसंघात ३ लाख ३० हजार ३७७, घनसावंगीत ३ लाख २८ हजार ६०६ आणि बदनापूरमध्ये ३ लाख ३८ हजार ९३६ मतदार आहेत.

**३० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करता येणार**

मतदारयादी तयार करण्यासाठी पात्रता दिनांक १ ऑक्टोबर २०२६ निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांना मतदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित दावा दाखल करता येणार आहे. तसेच प्रारूप मतदारयादीमध्ये नावाचा समावेश करण्याबाबत कोणताही दावा अथवा नावाच्या समावेशाबाबत आक्षेप असल्यास तोही विहित मुदतीत दाखल करता येणार आहे.

दावे-हरकतींसाठी ३० सप्टेंबर २०२६ ही अंतिम तारीख आहे. यासाठी संबंधित प्रकरणानुसार फॉर्म क्रमांक ६, ७ किंवा ८ मध्ये अर्ज दाखल करता येणार आहे.

तसेच, ज्या नागरिकांचे वय २०२६ मध्ये वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यास पात्र आहे, त्यांनी पात्रता दिनांक १ ऑक्टोबर २०२६ लक्षात घेऊन मतदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठी आवश्यक दावा दाखल करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अशा दाव्यांचा संबंधित वर्षाच्या पात्रता तारखेनुसार विचार करून त्यावर निर्णय घेण्यात येणार आहे.



**दावे-हरकती कुठे दाखल करावयात?**

नागरिकांना आपले दावे, हरकती अथवा अपील संबंधित मतदार नोंदणी अधिकारी किंवा सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात, तसेच संबंधित निवडणूक विभागाच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इडज) यांच्याकडे दाखल करता येणार आहेत. यासाठी संबंधित कार्यालयात अथवा इडज यांच्याकडे आवश्यक अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मतदारांनी प्रारूप मतदारयादीमध्ये आपले नाव आहे किंवा नाही, तसेच नाव, पत्ता व इतर तपशील योग्य आहेत का, याची पडताळणी करून आवश्यक असल्यास विहित मुदतीत दुरुस्ती अथवा हरकत नोंदवावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**मतदारसंघनिहाय संपर्क कार्यालये**

दावे व हरकती दाखल करण्यासाठी संबंधित मतदारसंघातील कार्यालयांचा तपशीलही प्रशासनाने जाहीर केला आहे. त्यानुसार परतूर विधानसभा मतदारसंघासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परतूर यांचे कार्यालय; अंबड विधानसभा मतदारसंघासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अंबड यांचे कार्यालय; जालना विधानसभा मतदारसंघासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जालना यांचे कार्यालय; बदनापूर विधानसभा मतदारसंघासाठी मतदार नोंदणी अधिकारी बदनापूर तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना आणि भोकरदन विधानसभा मतदारसंघासाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भोकरदन यांचे कार्यालय येथे अर्ज करता येणार आहेत.

**अंतिम यादीपूर्वी निर्णय प्रक्रिया**

प्राप्त दावे व हरकतींवर संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून निर्णय घेण्यात येणार आहे. याबाबत ३१ ऑगस्ट २०२६ ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असून, निर्णयानंतर पात्र दावे व हरकतींच्या आधारे मतदारयादीत आवश्यक बदल केले जातील.

दरम्यान, मतदारयादीबाबत संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयानंतरही मतदारांना नियमानुसार अपील करण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी, जालना यांच्याकडे नियमानुसार अपील दाखल करता येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मतदारांनी प्रारूप मतदारयादीची तपासणी करून आपले नाव व तपशील अचूक असल्याची खात्री करावी आणि आवश्यक असल्यास ३० सप्टेंबरपूर्वी दावे किंवा हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जालना यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### जरांगेंचा बंडू जाधवांना इशारा; शेतकरी मेळाव्यावरून परभणीत राजकीय वातावरण तापले

**परभणी । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी परभणीचे खासदार संजय ऊर्फ बंडू जाधव यांना इशारा दिल्यानंतर परभणीतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. परभणीत होणारा शेतकरी मेळावा रद्द करण्याची भूमिका जरांगे यांनी घेतली आहे. दुसरीकडे, हा मेळावा रद्द होणार नसल्याचे बंडू जाधव यांनी स्पष्ट केले आहे. या वादात आता शिवसेना नेते अंबादास दानवे यांनीही उडी घेत जरांगे यांच्या भूमिकेचे समर्थन केले आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी बंडू जाधव यांच्यावर जोरदार टीका करत त्यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली. परभणीत आयोजित करण्यात आलेला शेतकरी मेळावा रद्द करण्याचा इशाराही त्यांनी दिला. त्यामुळे मेळाव्याच्या आयोजनावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. दरम्यान, बंडू जाधव यांनी मेळावा रद्द होणार नसल्याचे स्पष्ट केले. लोक आता सर्व काही समजून घेत आहेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. रात्रीच मेळावा रद्द करण्यास सांगितले असते तर त्याचा विचार केला असता, असेही त्यांनी म्हटल्याचे समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर अंबादास दानवे यांनी मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला. मराठा आरक्षणाचा लढा सध्या निर्णायक टप्प्यावर असल्याचे दानवे यांनी म्हटले. एकनाथ शिंदे यांच्या मराठवाडा दौऱ्याचा संदर्भ देत दानवे यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. एकनाथ शिंदे यांनी यापूर्वी नवी मुंबई येथे मनोज जरांगे यांची भेट घेऊन अध्यादेश दिला होता. त्यावेळी मोठ्या प्रमाणात जल्लोष करण्यात आला होता. मात्र, त्या अध्यादेशाचे पुढे काय झाले, असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला. हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीचाही मुद्दा दानवे यांनी उपस्थित केला. गावागावांत जुन्या नोंदी उपलब्ध असल्याचे सांगितले जात असले तरी त्यासाठी सरकारकडून आवश्यक कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली नाही, असा दावा त्यांनी केला. निजामाच्या काळातील मराठा समाजाच्या नोंदी कुणबी म्हणून असल्याचा मुद्दाही त्यांनी मांडला.

मराठा समाज आरक्षणासाठी आंदोलन करत असताना सरकारमधील नेत्यांनी उत्सव आणि राजकीय मेळावे घेण्याऐवजी आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करावेत, असे दानवे यांनी म्हटले. शेतकरी आणि मराठा समाजातील तरुण आंदोलनाला बसलेले असताना राजकीय मेळावे घेणे योग्य नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. एकनाथ शिंदे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर दबाव आणावा. तसेच केंद्र सरकारकडे जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर चर्चा करावी, असा सल्लाही दानवे यांनी दिला. दरम्यान, एकनाथ शिंदे यांचा दौरा रद्द होणार का, असा सवाल दानवे यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी, दौरा रद्द झाला नाही तर त्याचे परिणाम भोगावे लागू शकतात, अशी भूमिका मांडली. मराठा समाज आरक्षणाच्या आंदोलनासाठी रस्त्यावर असताना अशा प्रकारचे उत्सव साजरे करणे चुकीचे असल्याचेही त्यांनी म्हटले. मनोज जरांगे यांनी शेतकरी मेळावा रद्द करण्याची घेतलेली भूमिका योग्य असल्याचे दानवे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे परभणीतील शेतकरी मेळाव्याच्या निमित्ताने मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा राजकीय केंद्रस्थानी आला असून, पुढील काळात या वादाला कोणते वळण मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### भरधाव ट्रकची चौघांना धडक; बहीण-भावाचा जागीच मृत्यू

**लातूर । प्रतिनिधी**

रेणापूर येथे भरधाव ट्रकने रस्ता ओलांडणाऱ्या चार जणांना जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. रेणापूर ग्रामीण रुग्णालयाजवळ हा अपघात घडला. ट्रकने मोटारसायकलला धडक दिल्यानंतर काही अंतरापर्यंत तिला फरफटत नेले.

## तानसा नदीत बुडून दोन सख्ख्या भावांचा मृत्यू; सुट्टीचा आनंद चौहान कुटुंबाच्या आयुष्याला काळा डाग

**मुंबई । प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील वज्रेश्वरी परिसरातील अकलोली येथे तानसा नदीपात्रात बुडून दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला. रविवारच्या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कुटुंबासोबत आलेल्या दोन्ही भावांना नदीपात्रातील पाण्याच्या खोलीचा आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडली. या घटनेमुळे चौहान कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अरुण राम बच्चन चौहान (वय १३) आणि आयुष राम बच्चन चौहान (वय १०) अशी मृत भावांची नावे आहेत. विरार येथील रिक्षाचालक राम बच्चन चौहान हे पत्नी, दोन मुले आणि एका मुलीसह रविवारच्या सुट्टीसाठी वज्रेश्वरी परिसरात आले होते. अकलोली येथील गरम पाण्याच्या कुंडावर आंघोळ केल्यानंतर चौहान कुटुंब तानसा नदीपात्राजवळ गेले. त्यावेळी दोन्ही मुले नदीच्या पात्रात काही अंतर आत गेली. मात्र, पाणी खोल असल्याने आणि प्रवाह असल्यामुळे त्यांना पाण्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे दोघेही बुडू लागले. दुर्दैवाने याचवेळी मुलांची आई काहीतरी खाण्यासाठी आणण्यासाठी बाजूला गेली होती, तर वडील रिक्षा साफ करत होते.

काही वेळाने दोन्ही मुले दिसत नसल्याचे लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांनी आरडाओरड केली. आवाज ऐकून स्थानिक तरुणांनी नदीपात्रात शोध सुरू केला. सुमारे तासभराच्या शोधानंतर दोन्ही मुले नदीत आंघोळ करत असलेल्या ठिकाणापासून काही अंतरावर आढळून आली. मात्र, त्यांच्या नाकातोंडात पाणी गेल्याने दोघांचाही मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. दोन्ही मुलांच्या मृत्यूची बातमी समजताच आई-वडिलांनी नदीपात्राजवळच हंबरडा फोडला. सुट्टीचा आनंद घेण्यासाठी आलेल्या कुटुंबावर अचानक दुःखाचा डोंगर कोसळल्याने उपस्थितांचेही डोळे पाणावले.

## ‘भाजपच्या लोकांनी मोहन भागवतांचे म्हणणे ऐकावे’; अभिजीत दिपके यांचा भाजपवर निशाणा

**मुंबई । प्रतिनिधी**

भाजपच्या लोकांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचे म्हणणे ऐकले पाहिजे. मात्र, सध्या भाजपमधील काही लोकांना आपण राष्ट्रीय स्वयंसेवक संघापेक्षाही मोठे असल्याचे वाटू लागले आहे, अशी टीका कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केली.



गेल्या १२ वर्षांपासून भाजप सत्तेत आहे. त्यामुळे देशातील सर्व यंत्रणा त्यांच्या ताब्यात असल्याची भावना निर्माण झाली आहे. याच कारणामुळे भाजपला आपण राष्ट्रीय स्वयंसेवक संघापेक्षा मोठे असल्याचे वाटू लागले आहे, असा आरोप दिपके यांनी केला.

मोहन भागवत यांनी तरुणांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काही भूमिका मांडल्या होत्या. आंदोलन करणाऱ्या तरुणांना देशद्रोही म्हणू नये, असे त्यांनी सांगितले होते. मात्र, त्यानंतरही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘दिमागी नक्षल’ अशी संज्ञा वापरली. यावरून पंतप्रधान मोदी आणि भाजप मोहन भागवत यांचे म्हणणे ऐकत नसल्याचे दिसून येते, असे दिपके म्हणाले.

एकीकडे मोहन भागवत सर्वसमावेशकतेची भाषा करतात आणि विद्यार्थ्यांचा अपमान करू नका, असे सांगतात. दुसरीकडे पंतप्रधानांकडून आंदोलनकर्त्यांसाठी वेगळी भाषा वापरली जाते. हे योग्य वाटत नाही. आमचे म्हणणे ऐकू नका, पण तुमचे मार्गदर्शक मोहन भागवत आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तरी ऐका. त्यांच्या पाठिंब्यामुळेच तुम्ही सत्तेत आला आहात, हे लक्षात ठेवा, असा टोला दिपके यांनी भाजपला लगावला.

दरम्यान, मोहन भागवत यांनी धर्म आणि मानवतेच्या मुद्द्यावरही भाष्य केले आहे. विविध धर्मांचे मार्ग वेगवेगळे असले तरी धर्मापलीकडे मानवता हा एक धर्म आहे. प्रत्येक माणसाचा सन्मान केला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. भारतात मुस्लिमांना स्थान नसावे असे मानणारी व्यक्ती खरा हिंदू असू शकत नाही, असेही भागवत यांनी म्हटले होते. त्यांच्या या भूमिकेवर सध्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. अभिजीत दिपके यांच्या टीकेवर भाजपकडून काय प्रतिक्रिया दिली जाते, याकडे आता लक्ष लागले आहे.

## जालन्यात ‘भटके विमुक्त दिवस’ उत्साहात साजरा

### पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांचा सहभाग; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, आरोग्य तपासणी व विविध उपक्रमांचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी**

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या निर्देशानुसार ३१ ऑगस्ट हा ‘भटके विमुक्त दिवस’ म्हणून जालना येथे विविध सांस्कृतिक, शैक्षणिक व माहितीपर उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास समाज कल्याण सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अनिता राठोड, प्रा. बी. वाय. कुलकर्णी, प्रा. अंकुश चव्हाण, विकास राठोड, विष्णुगिरी, अशासकीय सदस्य मुकेश भारद्वाज, मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक यांची उपस्थिती होती.

यावेळी मुलांचे व मुलींचे शासकीय वसतिगृह येथे आरोग्य तपासणी शिबिर, व्याख्याने व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच भटके विमुक्त जाती-जमातींच्या पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच भटके विमुक्त समाजाची संस्कृती, जीवनमूल्ये व परंपरा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय वसतिगृहांमध्ये सांस्कृतिक, शैक्षणिक व माहितीपर उपक्रम राबविण्यात आले. आरोग्य तपासणी, आधारकार्ड नोंदणी, जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्यासाठी शिबिरे आयोजित करण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आले.

मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक अनंत कदम यांनी यावेळी ‘भटके विमुक्त दिवस’चे महत्त्व विशद करून विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश बहिर यांनी केले. श्रीमती स्नेहल सोनावळे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी आपल्या बोलीभाषेत मनोगत व्यक्त केले. प्रा. अंकुश चव्हाण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर मुख्य वक्ते प्रा. बी. वाय. कुलकर्णी यांनी भटके विमुक्त समाजाचा इतिहास, संस्कृती, सामाजिक परिस्थिती तसेच शासनाच्या विविध योजनांबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व्ही. के. चव्हाण यांनी केले.

बंजारा समाजाची सांस्कृतिक ओळख असलेल्या पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, अधिकारी-कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विक्रोळीत ३२ वर्षीय महिलेची हत्या; अत्याचाराच्या प्रयत्नातून जीव घेतल्याचा पोलिसांचा दावा

**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळीतील कन्नमवार नगर परिसरात ३२ वर्षीय महिलेच्या मृत्यूला आता वेगळे वळण लागले आहे. सुनीता मोरे यांचा मृत्यू नैसर्गिक नसून त्यांची हत्या झाल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या प्रकरणी फजूल रहमान मेहरबान कुरेशी याला पोलिसांनी अटक केली आहे.



सुनीता मोरे या शनिवारी केळी विकण्यासाठी घराबाहेर पडल्या होत्या. त्यावेळी आरोपी फजूल रहमान कुरेशी याने त्यांना अत्याचार करण्याच्या उद्देशाने मच्छीमार्केट परिसरातील बंद दुकानात जबरदस्तीने नेल्याचे तपासात समोर आले आहे.

या ठिकाणी सुनीता मोरे यांनी बचावासाठी आरडाओरड करत प्रतिकार केला. त्यावेळी त्यांच्यात झटापट झाली. याचदरम्यान आरोपीने सुनीता यांची हत्या करून घटनास्थळावरून पळ काढल्याचा आरोप आहे.

दरम्यान, सुनीता मोरे यांचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान संशयित आरोपी फजूल रहमान याचा माग काढत पोलिसांनी रविवारी रात्री उशिरा त्याला अटक केली.

या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण असून, आरोपीने नेमक्या कोणत्या कारणातून हा गुन्हा केला आणि या घटनेशी संबंधित आणखी काही बाबी आहेत का, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**